स्थायी समितीच्या **बुधवार** दिनांक **31–10–2012** रोजी दुपारी **12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 4. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 5. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 9. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 12. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 13. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 14. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 2. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अति. निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 158 :– प्रभाग क्र.53–ब,गोकुलपेठ येथे कॅनल रोड ते श्री.शशी शुक्ला, ते तुम्पल्लीवार यांचे घरापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 41,26,098/– रकमेच्या कामास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 159 :– प्रभाग क्र.9 (''अ''व''ब'') मध्ये ठिक ठिकाणी डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु.29,92,898/– च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 160 :– प्रभाग क्र.4–ब,कामठी रोड ते मक्का मस्जीद पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रु. 50,00,000/– रकमेच्या कामास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 161 :– नागपूर शहरातील वाहतुक सिंग्नल असलेले चौरस्त्यांवर पेडेस्ट्रीयन क्रॉसींग, स्टॉप लाईन इत्यादी हॉट अप्लाईड थर्मोप्लास्टीक मटेरीयल नी आखण्याकरीता ची ई–निविदा मॅन्युफॅक्चर्स किंवा ॲथोराईझड डिलर कडून मागविण्याकरिता रु. 30,17,000/– च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 162 :– नागपूर महानगरपालिकेमध्ये स्व. अनुसयाबाई काळे स्मृती समुपदेशन केंद्र कौटुंबिक समस्या निवारण करण्याकरिता महिलांसाठी १० केंद्राची खाली नमूद बाबीवर विचार करुन निर्मिती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्वयंसेवी संस्थांची निवड व समुपदेशकाची निवड ही स्थायी समिती द्वारे गठीत करण्यांत आलेल्या उपसमितीच्या द्वारे करण्यांत येईल. गठीत उपसमिती खालील प्रमाणे.

१. श्री. दयाशंकर तिवारी – अध्यक्ष
२. श्री. प्रफुल्ल गुडधे – सदस्य
३. श्रीमती अल्का दलाल – सदस्य
४. श्रीमती हर्षदा जैस्वाल – सदस्य
५. श्री. सतिश होले – सदस्य

यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

१) या केंद्राद्वारे महिलांना कौटुंबिक,कायदेविषयक,सामाजिक समस्या सोडविण्यासाठी मदत तसेच कायदेविषयक मार्गदर्शन केले जाईल.

२) समुपदेशन केंद्र व मदत केंद्र महानगरपालिका यांच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामांकीत अशासकीय संस्थेच्या सहाय्याने चालविण्यात येईल.

३) या केंद्रासाठी महानगरपालिका यांचे १ ते १० झोनमधील कार्यालयातील २०० ते २५० चौ. फुट जागा उपलब्ध करुन दयावी लागेल.

४) या केंद्रासाठी महानगरपालिका यांचे सहाय्याने टेबल, खुर्च्या, कपाट, दूरध्वनी उपलब्ध करुन दयावे लागेल.

५) विज तसेच दूरध्वनी खर्च ज्या संस्थेद्वारे केंद्र चालविण्यात येणार आहे त्या संस्थेस करावा लागेल.

६) केंद्रात तीन अनुभवी समुपदेशक कार्यरत असतील. त्यापैकी दोन एम.एस.डब्ल्यू. व एक कायदा शाखेचा पदविधर असेल. समुपदेशक शक्यतो महिला असतील व महिला उमेदवार मिळणे शक्य नसल्यास पुरुष उमेदवार निवडण्यात येईल. समुपदेशकांचे तसेच विधी सल्लागाराची संपूर्ण माहिती फोटोसह ''महाराष्ट्र राज्य महिला आयोग'' यांचेकडे पाठवावी लागेल. समुपदेशकांची निवड स्वयंसेवी संस्था करतील, व स्वयंसेवी संस्थाची निवड म.न.पा. करेल.

७) सदर मदत केंद्र सुरुवातीला ८ तास चालविले जाईल व नंतर २४ तास दूरध्वनीवरुन संपर्क साधून गरजु महिलेला मदत देणेसाठी कार्यरत राहील.

८) समुपदेश, मदत केंद्र यांचा ''कार्य अहवाल'' दर तीन महिन्यानी महिला आयोग कार्यालयास व मा. आयुक्त म.न.पा. यांना कळविण्यात येईल.

उपरोक्त १० समुपदेशन केंद्र महानगरपालिके मार्फत १० झोनमध्ये स्व. अनुसयाबाई काळे स्मृती समुपदेश केंद्र नावाखाली राबविण्यात येईल.

वरील समुपदेशन केंद्राचा खर्च महिला व बाल कल्याण समिती पद क्रमांक २७४ मध्ये असलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 163</u> :— आरोग्य विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता कापडांचे नमुने समिती पुढे ठेवले असता खालील कापडांची निवड करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 1) | खाकी कापड एकुण 10188 मिटर प्रती मिटर रु. 97.00/— | —रु.9,88,236/— |
| 2) | पांढरा कापड एकुण 140 मिटर प्रती मिटर रु. 91.70/— | —रु. 12,838/— |
| 3) | स्काय ब्लु साडी एकुण 2862 नग प्रती मिटर रु. 278.58/— | —रु.7,97,296/— |
| 4) | ब्लाऊज दर रु.49.12 प्रती पिस कर्मचारी संख्या 2862 ( दोन ब्लाऊज ) | —रु.1,40,581/— |
| 5) | (अ) ब्लाऊज शिलाई प्रती दर रु.30.00/— एकुण 2862 पीस शिलाई | —रु. 85,860/— |
| | (ब) पॅन्ट व शर्ट शिलाई प्रती जोडी दर रु.125.00/— एकुण स.का.संख्या 1991×2 = 3982 | —रु.4,97,750/— |

अ.क्र. 1,2,3,4 व 5 मधील कापड खरेदी तसेच शिलाई करिता निविदेची अट शिथील करुन खरेदी करिता निवड केलेल्या महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांचे कडून कापड खरेदी तसेच नागपूर मध्यवर्ती करागृह, नागपूर यांचे कडून शिलाई आवेदनाव्दारे करण्यात येईल. कापड खरेदी व गणवेष शिलाई यावर अंदाजे रु. 25,22,561/–खर्च अपेक्षीत असुन होणारा खर्च आय– व्यय पद क्र. 273 मधुन भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 164</u> :– प्रभाग क्र.3–ब अंतर्गत मॉ. बम्लेश्वरी नगर, पिवळी नदी येथील रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामास्तव रु. 29,99,982/– रकमेच्या कामास पद क्र. 629 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 165</u> :– नागपूर महानगरपालिका मध्ये कार्यरत असलेले मा. पदाधिकारी व अधिका–यांना कार्यालयीन कामाकरीता चारचाकी वाहने दोन वर्षाकरीता (सन 2012–2013 व 2013– 2014) किरायाने घेऊन देण्यासाठी म.न.पा. तर्फे निविदाची जाहिरात On Line वर देण्यात आली होती. त्या अनुषंगाने एकुण 106 कंत्राटदारानी On Line वर निविदा सादर केली.

एकुण 106 निविदा पैकी 89 निविदा धारकांनी निविदाच्या अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्रे बरोबर सादर केल्यामुळे त्यांचे निविदे मंजुर करण्यात आले व उर्वरीत 17 निविदा धारकांनी निविदाच्या अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्रे बरोबर सादर न केल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यांत आली.

एकुण 89 निविदा पात्र ठरल्यामुळे त्यांचे निविदा दर (Price Bid ) उघडण्यांत आले व एकुण 89 निविदा धारकांचे निविदा दर उघडण्यात आल्या नंतर खालील प्रमाणे निम्नतम दर प्राप्त झालेत.

**<u>Vehicle Lowest Rate</u>**

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | मासिक भाडे | अतिरीक्त तास 10 तासा नंतर | अतिरीक्त किलोमीटर 2000 कि.मी नंतर |
|---|---|---|---|---|
| 1 | टॅक्सी परमीट मारोती व्हॅन | रू. 17300=00 | रू.45=00 | रू.06=00 |
| 2 | टॅक्सी परमीट टाटा इन्डीका **एसी** | रू. 22000=00 | रू.55=00 | रू.07=00 |
| 3 | टॅक्सी परमीट टाटा इन्डीका **नॉन एसी** | रू. 20000=00 | रू.50=00 | रू.06=00 |
| 4 | टॅक्सी परमीट टाटा इन्डीगो **एसी** | रू. 30000=00 | रू.70=00 | रू.08=00 |
| 5 | टॅक्सी परमीट टाटा इन्डीगो **नॉन एसी** | रू.29000=00 | रू.60=00 | रू.08=00 |
| 6 | टॅक्सी परमीट टाटा सुमो **एसी** | रू.28500=00 | रू.85=00 | रू.09=00 |
| 7 | टॅक्सी परमीट टाटा सुमो **नॉन एसी** | रू.26000=00 | रू.75=00 | रू.08=00 |
| 8 | टॅक्सी परमीट ऑटो रिक्षा विथ लाऊडस्पीकर | रू.27000=00 | रू.100=00 | रू.10=00 |
| 9 | टॅक्सी परमीट टाटा 207 | रू.58000=00 | रू.300=00 | रू.75=00 |
| 10 | टॅक्सी परमीट टाटा 407 | रू.48000=00 | रू.250=00 | रू.17=00 |

तरी उपरोक्त विविध वाहनांचे प्राप्त निम्नतम दर हे सन 2012–2013 व 2013–2014 या दोन वर्षा करीता दर करार म्हणून व या दराप्रमाणे विविध वाहने वेळोवेळी संबंधित निविदा धारकांकडून किरायाने घेऊन म.न.पा. चे मा. पदाधिकारी व अधिका–यांना कार्यालयीन कामाकरीता वाहने देण्याबाबत व या करीता होणा–या खर्चाला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यांस एकमताने मंजूरी प्रदान केली. खर्च पद क्र 42 मधुन करण्यात येईल.

**<u>ठराव क्रमांक 166</u>** :— प्रभाग क्र.2—अ नारी गांव येथील पिवळी नदीला संरक्षक भिंत बांधकामास्तव रु. 49,59,886/— रकमेच्या कामास पद क्र. 618 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.